RNI MAHMAR
36829-2010


ISSN- 2229-4929

Peer Reviewed

# Akshar Wangmay

International Research Journal
UGC-CARE LISTED

**Special Issue - VII**
**Interdisciplinary View on Socio-Economic, Educational, Management, Environmental, Research, Language and Sustainable Development in Covid-19 Pandemic Situation**



January 2021






**Chief Editor : Dr. Nanasaheb Suryawanshi**

**Executive Editor : Prof. Kartik R. Patil**

**Principal,**
Rashtrasant Tukdoji College, Chimur
Ta-Chimur, Dist-Chandrapur (Maharashtra)

**Co-Editor : P. M. Rajurwade**





Address
'Pranav', Rukmenagar,
Thodga Road, Ahmadpur, Dist- Latur 413515 (MS)

# AKSHAR WANGMAY

**International Peer Reviewed Journal**

**UGC CARE LISTED JOURNAL**

**January 2021**

**Special Issue -Volume-VII**

**On**

***"Interdisciplinary View on Socio-Economic, Educational, Management, Environmental, Research, Language and Sustainable Development in Covid-19 Pandemic Situation"***

**Chief Editor**
**Dr. Nanasaheb Suryawanshi**
Pratik Prakashan, 'Pranav, Rukmenagar, Thodga Road Ahmedpur,
Dist. Latur, -433515, Maharashtra

**Executive Editor**
**Prof. Kartik R. Patil**
**Principal,**
Rashtrasant Tukdoji College, Chimur
Ta-Chimur, Dist-Chandrapur (Maharashtra)

**Co-Editor**
**P. M. Rajurwade**
Rashtrasant Tukdoji College, Chimur
Ta-Chimur, Dist-Chandrapur (Maharashtra)

**Editorial Board**

| | | | |
|---|---|---|---|
| Dr. Praful T. Bansod | Dr. Haresh T.Gajbhiye | Prof. Ashutosh M.Popte | Prof. Pitambar T. Pise |
| Dr. Nitin T. Katrojwar | Dr. Rajeshwar D. Rahangdale | Dr. Laxman T. Kamdi | Dr. Udhay D. Mendulkar |
| Dr. Santosh P. Bansod | Dr. Dilip S.Telang | Prof. Kishor S.Chaure | Dr. Manisha Warma |
| Dr. Rupesh M.Meshram | Dr. Sharad B. Belorkar | Dr. Subhas K. Shinde | Dr. Chetankumar Vyas |

**Published by-** Prof. Kartik R Patil, Off. Principal, Rashtrasant Tukdoji College, Chimur, Ta-Chimur, Dist-Chandrapur (Maharashtra)

The Editors shall not be responsible for originality and thought expressed in the papers. The author shall be solely held responsible for the originality and thoughts expressed in their papers.

© All rights reserved with the Editors

Price :Rs.1000



I/C Principal
Art's, Commerce & Science Mahavidyalaya
Gadhinglaj, Dist. Kolhapur

| | | |
|---|---|---|
| 45 | आरोग्य आणि शाश्वत विकास<br>**डॉ. आरती बी. पडोळे** | 148-150 |
| 46 | कोविड -19 चा भारतातील सामाजिक संस्थावरील प्रभाव<br>**डॉ. रामेश्वर एम. मोरे** | 151-153 |
| 47 | लिंगभाव विषमता आणि स्त्री<br>**प्रा. डॉ. अनुराधा एम.खाडे** | 154-155 |
| 48 | पटना जिला के अन्तर्गत बजार समिती (सैदपुर) गंदी बस्ती के निवासरत लोगों का सामाजिक, आर्थिक एवं संस्कृतिक एक भौगोलिक विश्लेषण<br>**रूबी कुमारी** | 156-159 |
| 49 | भूमि उपयोगिता एवं व्यावसायिक संरचना बक्सर जिला के संदर्भ : एक भौगोलिक विश्लेषण<br>**जैनेन्द्र कुमार** | 160-162 |
| 50 | सामाजिक एवं सांस्कृतिक व्यवस्था में अनुसूचित जातियों में परिवर्तन: बक्सर जिला के संदर्भ में<br>**राज किशोर कुमार** | 163-166 |
| 51 | कोरोना महामारी : (Pandemic)<br>**डॉ. संजय तुकाराम वाघमारे** | 167-169 |
| 52 | कोरोनाचा आर्थिक संबंध<br>**प्रा. स्वप्निल एस. बोबडे** | 170-173 |
| 53 | कोविड-१९ चा भारताच्या शिक्षण क्षेत्रावर पडलेला प्रभाव<br>**प्रा.डॉ. प्रफुल्ल तू. बन्सोड** | 174-177 |
| 54 | संस्थानकालीन सण-उत्सव: विषेश संदर्भ जत संस्थान<br>**डॉ. सुरेश मारूती चव्हाण** | 178-180 |


प्रभारी प्राचार्य
...महाविद्यालय
गडहिंग्लज, जि. कोल्हापूर

'Akshar Wangmay' UGC Care Listed, International Research Journal, ISSN: 2229-4929, January 2021
Special Issue, Volume-VII *"Interdisciplinary View on Socio-Economic, Educational, Management, Environmental, Research, Language and Sustainable Development in Covid-19 Pandemic Situation"*

# संस्थानकालीन सण-उत्सव: विषेश संदर्भ जत संस्थान

**डॉ. सुरेश मारूती चव्हाण**

इतिहास विभाग प्रमुख, कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, गडहिंग्लज जि.कोल्हापूर (महाराष्ट्र)

**प्रस्तावना-** कोणत्याही देशाच्या सामाजिक सांस्कृतिक जडणघडणीमध्ये सण- उत्सवांना महत्त्वाचे स्थान असते. भारताच्या सांस्कृतिक ओळखीमध्ये सण - उत्सवांचे योगदान महत्त्वपूर्ण राहिले आहे. किंबहुना भारत हा उज्वल सांस्कृतिक वारसा सांगणारा जगामधील महत्वाचा देश आहे. प्राप्त परिस्थितीनुसार भारताच्या सण - उत्सवामध्ये बदल होत गेले असले तरी संस्थानकालीन सण-उत्सवाचे अस्तित्व आज ही समाजामध्ये दिसून येते. स्वातंत्रपूर्व भारतामध्ये 562 संस्थाने होती. त्यामध्ये 18 दक्षिणी संस्थानांचा समावेश होतो. या दक्षिणी संस्थानमध्ये जत हे एक महत्त्वाचे संस्थान होय. भौगोलिक परिस्थितीनुसार नैसर्गिक दृष्ट्या हे संस्थान अविकसति असले तरी काही बाबतीत निश्चितच विकसित स्वरूपाचे होते. जसे की, दुष्काळी संस्थान म्हणून ते ओळखले जात असले तरी त्यावर मात करण्यासाठी संस्थानच्या अधिपतींनी केलेले प्रयत्न फारच वाखाणन्याजोगे होते. शिवाय या संस्थानाच्या सांस्कृतिक जीवनामध्ये सण - उत्सवांचे विशेष महत्त्व होते. म्हणूनच प्रस्तुत शोधनिबंधामध्ये जत संस्थानातील सण- उत्सव यावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला आहे.

**संस्थानाची पार्श्वभूमी -**

मध्ययुगीन काळातील महराष्ट्रात जी पराक्रमी घराणी उदयास आली त्यामध्ये जतचे चव्हाण उर्फ डफळे घराणे महत्वाचे होते. याच घराण्यातील सटवाजी चव्हाण - डफळे यांच्या नेतृत्वाखाली इस. 1680 च्या सुमारास जत संस्थान उदयास आले. या संस्थानात 119 खेडयांचा समावेश होत असून सुमारे 4 लाख एवढे वार्षिक महसूल उत्पन्न होते. मराठी सत्तेचे पराक्रमी सेनापती प्रतापराव गुजर यांनी आदिलशहाचा बलाढय सरदार बहलोलखान लोदी याला संस्थानातील ऐतिहासिक उमराणी येथे झालेल्या संघर्षात पराभूत केले होते. या शिवाय या भुमीत यल्लम्मा व दानम्मा या दोन देवींनी अवतार घेतल्याने तीर्थक्षेत्राचा दर्जाही प्राप्त झालेला आहे. विविध अर्थांनी प्रगती पथावर पोहचलेल्या या संस्थानचे श्रीमंत विजयसिंह राजे डफळे हेशेवटचे अधिपती होते. त्यांच्याच कारकिर्दीत मार्च 1948 रोजी हे संस्थान भारतीय संघराज्यात विलीन झाले.

**संस्थानातील सण व उत्सव:** जत संस्थानात हिंदू- इस्लाम, लिंगायत, जैन, बौद्ध यांसारख्या विविध धर्माचे लोक राहात असल्यामुळे विविध प्रकारचे सण - समारंभ साजरे केले जात होते. ते पुढील प्रमाणे.

**रामराव उत्सव:** जत संस्थानात थोरल्या महाराजांचा म्हणजेच प्रजाहितदक्ष थोर अधिपती श्रीमंत रामराव आबासाहेब डफळे यांचा 'पुण्यतिथिदिन' (रामराव डे) साजरा करण्याची प्रथा होती. हा उत्सव रामराव उत्सव या नावानेही ओळखला जात असून तो ऑगस्ट महिण्यात संपन्न होत असे.

**गुडीपाढवा:** चैत्र महिन्यातील पहिल्याच दिवशी हा सण साजरा केला जाई. यादिवशी घराच्या समोर बांबूच्या काठीला स्वच्छ करून त्यावर चांदी किंवा तांब्याचे भांडे पालथे घालून त्यात नवे कापड अडकावून गुडी उभारली जाई. तिचे पूजन करून लिबांच्या फुलाबरोबर नारळीप्रसाद व साखर मिश्रित करून वाटण्याची व खाण्याची परंपरा होती. साडेतीन मुहूर्तपैकी एक मुहूर्त असल्याने या दिवषी अनेक चांगल्या कामांचा प्रारंभ होत असे तर खेडया-पाडयांत पंचांग वर्तविण्याचा सोहळा होत असे

**दसरा:** समाजातील सर्वच स्तरातून हा सण साजरा केला जात असल्याने तो एक राष्ट्रीय सणच होता. साडेतीन मुहूर्तपैकी एक असल्याने प्रत्येकजण दसऱ्याची कटाक्षाने प्रतीक्षा करत असे. कारण कोणत्याही शुभकार्याचा आरंभ या दिवशी करण्याचा प्रघात होता. यादिवशी सकाळी चव्हाण उर्फ डफळे राजघराण्याची जुन्या राजवाड्यातील राम मंदिरापासून ते छत्रीबागेपर्यंत वाजत गाजत सर्व लवाजम्यासह मिरवणूक निघते. त्यानंतर छत्रीबागेतील आपट्याच्या झाडाची व पानांची पूजा केली जाते व प्रातिनिधिक स्वरूपात सोने वाटण्याचा कार्यक्रम होतो. त्यानंतर ती मिरवणूक मुख्य राजवाड्यावर (रामविलास पॅलेस) जाऊन मोठा दरबार भरविला जातो आणि तिथे जतेतील सर्व जनता व राजघरण्यातील मंडळी यांच्यात सोने वाटण्याचा सुंदर सोहळा संपन्न होत असे याच दिवशी चिनगीबाबा नावाच्या मुस्लीम फकिराच्या कृपाशिर्वादामुळे डफळयाना स्वतंत्र जहागीर मिळाली त्यांच्या स्मृतिपित्यर्थ चिनगीबाबांचे पांढऱ्या रंगाचे निशान (जुन्या राजवाड्यावरील) जसजसा सूर्य उगवून वरती येईल तसतसा जुने निशाण उतरवून नवे निशाण चढवण्याची प्रदीर्घ परंपरा जत संस्थानात होती. सरदरचे निशाण संस्थानातील जतबरोबरच उमराणी, डफळापूर येथील राजवाड्यावरही लावण्याची परंपरा दिसून येते. शिवाय दसऱ्याच्या दिवशी बाहेरच्या बाजूला बकरे कापले जाते व अतील बाजूस डफळे सरकारकडून मलिदयाचा नैवेद्य दाखविला जातो. याच दिवशी अधिपती व जनता यांच्यातील संबंधाचा आनंद ओसांडून वहत असल्याचे दृष्य दिसून येते. ही परंपरा फार पूर्वीपासून आजही चालू असल्याचे पाहावयास मिळते.याच दिवशी पांडवांनी शस्त्रपूजा केली होती. म्हणून राजघराणे व मराठी लोक आपल्याकडील हत्यारांची स्वच्छता करून समारंभपूर्वक पूजत असत. गावागावांत नटून-थटून सीमोल्लंघन केले जाई.

**रामनवमी:** हा एक संस्थानातील महत्त्वाचा सण होता. या सणाच्या काही दिवसांपूर्वी संस्थानातील रामकृष्ण सोनार यांचे घरी रामाची सुंदर मूर्ती बनविली जाते आणि प्रत्यक्ष रामनवमीच्या दिवशी त्या मूर्तीची राजघराण्याकडून मोठी मिरवणूक काढली जाते. ही मिरवणूक जुन्या राजवाडयातील राम मंदिरातून सुरू होऊन संपूर्ण जतभर फिरून पुन्हा राजवाडयात येत असे. त्यानंतर रामजन्माची पूर्ण कहाणी ऐकवली जाते. यावेळी जत व आजूबाजूच्या खेडे गावातील बहुसंख्य महिला उपस्थित असत. रामाची प्रतिमा पाळण्यात ठेवून महिलाकडून गाणी ,भजन ,कीर्तन, प्रवचन इत्यादी कार्यक्रम अत्यंत आनंदी वातावरणात केले जात असत.

**गोकूळ अष्ठमी :** गोकूळ अष्ठमी या सणाची परंपरा जत संस्थानात पूर्वीपासून असली तरी पुतळाराजे साहेबांच्या कालखंडात या उत्सवाला मोठे स्वरूप प्राप्त झाले होते. कारण पुतळाराजे या श्रीमंत रामराव डफळे यांच्या सौभाग्यवती व जत संस्थानच्या थोरल्या राणीसाहेब होत्या. त्या विठ्ठलाच्या निःसिम भक्त होत्या. त्या नेहमी पंढरपूरला विठ्ठलभक्तीसाठी जात असत. एवढेच नव्हे तर त्यांनी चार अभंगमालाही प्रसिद्ध केल्या होत्या. त्यामुळे त्यांनी गोकूळ अष्ठमी या समारंभाच्या संदर्भात फार मोठे कार्य केल्याचे आढळते. या दिवशी संस्थानच्या वाड्यावर मुख्य संभारंभाचे आयोजन केले जात असून त्यावेळी प्रवचन कीर्तन, खेळ, गाणी यासारखे विविध कार्यक्रम सादर केले जात असत. त्या विठ्ठलाबरोबरच कृष्णाच्याही भक्त असल्याने पुतळाराजेंनी वाडयात सर्वत्र विठ्ठल व कृष्णाच्या विविध स्थितींमधील मुर्त्या व फोटो लावलेले होते.

**बेंदूर:** जत संस्थानात शेतकऱ्याची संख्या सर्वाधिक असल्याने बेंदूर या सणाला विशेष महत्त्व होते. संस्थानात 3 प्रकारचा बेंदर तथा पोळा साजरा होत असल्याचे जेष्ठ मंडळींकडून सांगितले जाते. जसे की काही भागात श्रावणी पोळा साजरा केला जाई. काही ठिकाणी आषाढी बेंदूर तर काही भागात कर्नाटकी बेंदूर साजरा केला जात असे. तो आजही दिसून येतो. या दिवशी ज्यांच्या बळावर शेतकऱ्यांना शेती पिकवून उदरनिर्वाह करता येतो त्या बैलांची, गायींची व दूध-दूभत्या जनावरांची पूजा केली जाते. त्यांना रंगरंगोटी करून मिरवणूक काढून गोड-धोड पदार्थ खाऊ घातले जात असत तर काही खेडयांत बैलांचे खेळ (मिरवणूक काढून) केले जात असत.

**छत्रीबाग उत्सव:** हा जत संस्थानी प्रजेच्या अतिआनंदाचा क्षण मानला जात असे. छत्रीबागेचा उत्सव हा सर्वसाधरणपणे रामरावांच्या मृत्यूनंतर सुरू झालेचे कागदपत्रातून आढळून येते हा उत्सव थोरले महाराज श्रीमंत रामराव उर्फ आबासाहेब डफळे यांच्या स्मृतिपित्यर्थ भरविला जाई. तो ऑगस्ट महिन्यात होत असून तो सुमारे सात दिवस चालत असे. या उत्सवात सुरूवातीस रामराव महाराजांच्या प्रतिमेची भव्य मिरवणूक काढली जाई. त्यानंतर छत्रीबाग परिसरातील प्रांगणात भजन, कीर्तन, प्रवचने, खेळा, स्पर्धा, गाणी इत्यादी विविध कार्यक्रम संपन्न होत असत. या उत्सवामध्ये प्रवचन देण्यासाठी महाराष्ट्रातील अनेक नामवंतांनी हजेरी लावल्याचे जेष्ठ नागरिक सांगतात. उदाः दांडेकर मामा, बंकटस्वामी, भाऊसाहेब महाराज उमदीकर, संतश्रेष्ठ तुकडोजी महाराज, स्वामी विवेकानंदाचे शिष्य भविश्यानंद, पागावकर महाराज, श्री शिवलिंगव्वा अक्का, यासारसखे अनेक संत पुरूष येऊन गेलेले होते. या उत्सवात जत बरोबरच आजूबाजूच्या बहुतांषी खेड्यांतील जनता मोठ्या उत्साहाने व आनंदाने सहभागी होत होती

वरील सण समारंभाबरोबरच जत संस्थानात नागपंचमी, धूलीवंदन, नारळी पौर्णिमा, गणेष चतुर्थी, नवरात्रउत्सव, विजयादषमी, कोजागिरी पौर्णिमा, दीपावली, गौरीपूजन, तुलशी विवाह मकर संक्रात ,महाशिवरात्री, होळी किंवा शिमगा, रंगपंचमी यांसारखे सण व उत्सव ही मोठ्या उत्साहात व प्रचंड सहभागाने साजरे होत असत. याचबरोबर वटपोर्णिमा, सर्वपित्री अमावस्या, घटस्थापना, हनुमान जयंती, अंनत चतुर्थी, दत्त जयंती, बसवेश्वर जयंती, छत्रपती शिवाजी महाराज जयंती यांसारखे छोटे मोठे उत्सव वारकरी संप्रदायाची भजने कीर्तने ,भारूडे, गोंधळ, प्रवचने, जागरण, शाहिरी, धनगरी ओव्या, गाणी इत्यादी सांस्कृतिक कलेच्या माध्यमातून उत्सव साजरे होत असत

**समारोप -** संस्थाने हे मध्ययुगीन भारताचे खास वैशिष्टये मानले जाते. भारतातील वेगवेगळया संस्थांनानी व्यापलेल्या प्रदेषाला संस्थानी भारत म्हणून ओळखले जात होते. यामध्ये दक्षिण भारतातील जत संस्थानाने स्वतःचे वेगळेपण जपलेले होते. दुष्काळासारख्या समस्यांचा सामना करणाऱ्या या संस्थानातील सामाजिक जीवन फारच समृध्द होते. संस्थानात विविध जाती धर्मांचे लोक राहात असल्यामुळे साजऱ्या केल्या जाणाऱ्या सण-उत्सवांमध्ये वैविध्यता आढळते. पांरपरिक संण उत्सावाच्या बरोबरच प्रजाहित दक्ष थोर अधिपती श्रीमंतरामराव आबासाहेब डफळे यांचा पुण्यतिथी दिन हा रामराव डे व छत्रीभाग उत्सव साजरा करण्याची मोठी पंरपंरा होती. दरबारी समारंभापासून ते सामाजिक उत्सवांपर्यंत साजऱ्या होणाऱ्या सर्वच सण उत्सवांमध्ये सर्वधर्मिय जनता मोठया आनंदाने सहभागी होत होती. संस्थानातील सामाजिक जीवनात सलोख्याचे वातावरण होते. एकूणच मुस्लीमांच्या सण-उत्सवात इतर धर्मिय जनता तर इतर धर्मियांच्या सण -उत्सवात इस्लाम धर्मिय जनता मोकळया मनाने व आनंदाने सहभागी होत असल्याचे दिसून येते.

संदर्भ सूची:

1) व्ही. जी. भीडे, 'जत संस्थानाचा संक्षिप्त इतिहास, आर्यभूषण छापखाना पुणे, 1924, पानं नं.4,5,19,20
2) जी.डी.दळवी.,मराठा कुळांचा इतिहास भाग तीन चव्हाण उर्फ डफळे घराण्याची कैफियत, मुंबई 1913 पांन न.4
3) कृष्णा इंगोले, 'माणदेश: स्वरूप आणि समस्या', माणगंगा प्रकाशन कमलापूर सांगोला,1988, पा.न. 65.70
4) बाळकृष्ण खाडे,'माणदेशी संस्कृती आणि अस्मीतता' शभू महादेव प्रकाशन, मुंबई,2005 पांन नं.67,68
5) Annul Administration Report of jath State, Year 1933-34 page No.2
6) Maharashtra State Gazetteers, opt. P. No 176, 178, 180
7) मुलाखत, श्रीमंत ज्योत्स्नाराजे अनिलराजे डफळे सस्थांन जत, दिनांक 27/05/2013,
8) अ.रा.कुलकर्णी व ग.ह.खरे, मराठयांचा इतिहास खंड2